BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024

# विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद आवश्यक : डॉ. एस.डी.पवार

**पाटण / प्रतिनिधी**

पालकांनी पाल्याच्या उज्वल भवितव्यासाठी फक्त अभ्यासासाठी मागे न लागता त्यांच्याशी सुसंवाद साधणे आवश्यक बनले आहे. या वयात विद्यार्थी जरा जास्तच संवेदनशील असतो. त्याला प्रेमाने बरे वाईट सांगून त्याला योग्य दिशा दाखवली पाहिजे, असे मत बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणचे प्राचार्य डॉ. एस. डी.पवार यांनी व्यक्त केले. ते कनिष्ट महाविद्यालयातील आयोजित पालक मेळाव्यात अध्यक्ष म्हणून बोलत होते.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेज, कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ट महाविद्यालयात पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तर प्रमुख पाहुणे म्हणून कनिष्ट महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. दिपक दाभाडे उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.पवार हे उपस्थित होते, प्रमुख उपस्थिती म्हणून पालक मेळाव्याचे समन्वयक प्रा. रमेश शिर्के, वर्गशिक्षका प्रा. दिपाली किर्तावडे, प्रा.कु.के.आर पवार यांची उपस्थिती होती. प्रा. आर. के शिर्के यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दिपाली किर्तावडे यांनी मनोगत व्यक्त केले.



पालक मेळाव्यात बोलताना डॉ. एस. डी. पवार

प्रमुख पाहुणे प्रा. दीपक दाभाडे यांनी ग्रामीण भागातील मुलांच्या विकासासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते. विद्यार्थ्यांना सर्वतोपरी ज्ञान देण्याचे काम आम्ही करत आहोत पण पालकांनी सुद्धा आपल्या पाल्याला किमान अभ्यासाबाबत चौकशी केली पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी कनिष्ट महाविद्यालयात घेण्यात येणारे विविध उपक्रम याबद्दल माहिती सांगितली. यावेळी काही पालकांनी सुध्दा मनोगते व्यक्त केली. पालक मेळावा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. टी. आय. पाटणकर यांनी केले तर आभार प्रा. कु. के. आर.पवार यांनी मानले. या पालक मेळाव्यासाठी प्रा. ए. बी. वाकसे, प्रा. ए. के. पावसकर, प्रा. एस.जी. फुटाणे, प्रा. पी.एस. कुंभार, प्रा. टी. डी. चव्हाण, प्रा. कु. एन.जी. नलवडे, प्रा. कु. बी.व्ही. जाधव, प्रा.एस.एस. टोपले, प्रा. पी.आर. झुळझुळे. यांच्यासोबत पालक व विद्यार्थी उपस्थित होते.